**नियमित दिवाणी दावा क्र १३६३/२०२२**

**<u>निशाणी २९ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी याच्या वतीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अंतर्गत दाखल करण्यात आलेला आहे.

२. अर्जाकामी वादीची कथने आहेत की, वादीची कथने आहेत की, दावा कलम १अ मधील त्यास तळ अधिक एक मजला असा मजकुर समाविष्ट करावयाचा असुन दाव्याकामी परिच्छेद क्र.९अ व ९ब हादेखील समाविष्ट करावयाचा आहे. सदर परिच्छेदांमधील मजकुर हा दावा दाखल झाल्यानंतर घ डलेल्या घटनांवर आधारीत असल्याने येणेप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादीने केलेली आहे.

३. पुरेशी संधी देवुनही प्रतिवादी आपला लेखी जबाब सादर करण्यात असमर्थ राहिले.

४. प्रस्तूत दाव्याकामी दाव्यात वादींच्या वतीने पुरावा सादर करण्यात आलेला नाही. एकंदरीत दाव्याचे स्वरूप पाहता अर्जातील नमुद दुरूस्ती करणे आवश्यक ठरते तसेच, सदरहु दुरूस्तीमुळे दाव्यातील स्वरूपात बदल होत नसल्याने आणि दाव्याचा निकाल अंतिम गुणवत्तेवर लागण्याकरीता मी येणेप्रमाणे आदेश पारीत करत आहे—

**<u>आदेश</u>**

१. निशाणी क्र.२९ खालील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे दुरुस्ती ही १४ दिवसांच्या आंत करुन घेण्यात यावी.

**ठिकाण : नाशिक** **(सौ. शितल स. बांगड)**
**दिनांक : ०५/१२/२०२५** **५वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नाशिक**